Vol 2 Issue 10 July 2013

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

*Review Of Research*
Vol.2, Issue. 10, July. 2013
**ISSN:-2249-894X**

Available online at www.reviewofresearch.net

ORIGINAL ARTICLE

# पेशवेकालीन महाराष्ट्रातील विविध सावकारी वर्ग

*प्राचार्य डॉ. बी.व्ही. चौधरी*

वसुंधरा कला महविद्यालय, जुळे सोलापूर, सोलापूर

***प्रस्तावना :***

भारत कृषीप्रधान देश होता व आहे. महाराष्ट्रात देखील कापसाचे पिक मोठया प्रमाणात येत होते. कापड मानवाची मूलभूत गरज देखील राहत आली आहे. म्हणून कापड व्यापारी सावकारीच्या व्यवसायात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे दिसून येते. पेशवे हे पंतप्रधान असले तरी खरीखुरी सत्ता पेशव्यांच्या हाती होती. ब्राह्मण असल्याने समाजाचे धार्मिक नेतृत्वही त्यांना करावे लागत होते. 18 व्या शतकातील महाराष्ट्र हा धार्मिक रूढींचा प्रभाव असणारा होता. सरकार विविध महत्त्वाच्या प्रसंगी जसे उत्सव, वाढदिवस, लग्न, नामकरण, जातकर्म इत्यादी थोडक्यात सोळा संस्काराच्या वेळी कापड खरेदी करतच असे. आपल्या लहान लहान पदावरच्या नोकरांना सैनिकांना अशा वेळी कापड फुकट देण्यात येत असे. इतर राज्यांशी संबंध व्यवस्थित ठेवण्यासाठी त्यांच्याकडून प्रशंसा मिळविण्यासाठी त्यांना कपडे देणे आवश्यक वाटत होते. याशिवाय स्वतःच्या वापरासाठीही कापडाची खरेदी केली जात होती. कापड व्यापारी सहाजिकच त्यांना सावकाराकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीवर निर्भर होते. पुणे व त्याभोवताली शेकडो हातमाग कापसाच्या कापडाचे उत्पादने करत होते. त्यावर सोने आणि चांदीच्या वेलबुट्टीचे काम केले जात होते.[1] हा व्यवसाय भरभराटीला आला होता. म्हणून सावकारी देखील विकसित झाली होती. पैठण, नगर, येवला, संगमनेर, नाशिक, सोलापूर इत्यादी ठिकाणी कापड व्यापार मोठया प्रमाणावर होत होता. तेव्हा या भागात सावकारही मोठया प्रमाणावर होते. यात पैठणच्या सावकारांनी ऐतिहासिक प्रसिद्धी मिळविली होती.

***1) कापडकरी सावकार :***

कापडकरी सावकारांच्या मोठया प्रमाणात नोंदी आढळतात. ज्या सावकारांचा संबंध कापड व्यवसायाशी होता त्यांना कापडकरी सावकार म्हणत. परांजपे—पारगांवकर सावकारच होते. 1751 मध्ये गोपाळ केशव यास पेशव्यांनी कापडाचे दुकान सुरू करण्यासाठी 10,000 रूपये दिले होते. त्यांनी ती रक्कम सरकारला परत केली होती याची नोंद अशी —

| रूपये | |
|---|---|
| 1820 | नारोबा नाईक यांच्याकडून कापड खरेदी |
| 68034 | गणोबा नाईक यांच्याकडून कापड खरेदी |
| 2229 | तळेगावच्या गंगाधर वानवळे यांच्याकडून कापड खरेदी |
| 8350 | गोविंद नाईक दातार यांच्याकडून रोख खरेदी |
| 2117 | गोविंद नाईक दातार यांच्याकडून उधार खरेदी |
| 12855 | गोविंद नाईक दातार यांच्याकडून उधार खरेदी |

हा उल्लेख पट्टी खात्याचा आहे. बऱ्हाणपूरकर या कापडकरी सावकाराने पेशव्यांना 9086 रूपयांचे कापड पुरविले होते. त्यामधील उल्लेख केशवदास ईश्वरदास आणि पितळदास यांचा आहे. ज्यांनी हा पुरवठा केला होता त्यांचा हा उल्लेख आहे. सरकारच्या लेखापरीक्षणाच्या वेळी या व्यापाऱ्यांची नावे द्यावी लागत होते असे यावरून स्पष्ट होते आणि त्यानुसारच 1751 मध्ये ज्या महाराष्ट्राबाहेरच्या सावकारांच्या नावाचा उल्लेख आढळतो तो पहिल्या बाजीरावच्या काळापासून होता. लक्ष्मण नाईक चाबूकस्वार या कापडकरी सावकारास 5 लाख रूपये कापड खरेदीची रक्कम अदा केल्याचा उल्लेख आढळतो. या सावकारांनी पेशव्याच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे आढळते. 1764—65 मध्ये एका 2152416 रूपये कापड व्यापारात गुंतविल्याचा उल्लेख आढळतो.[2] इतरांनी या व्यवसायात यावे असे प्रयत्न केले जात होते. पुणे दप्तर खान्यातील घडणी दप्तरात त्याची विस्तृत माहिती मिळते. पुण्यास मोठया प्रमाणात कापड उत्पादन होत होते. तरी पेशवे बनारस, चंदेल, पैठण, सूरत, कर्नाटक, बंगाल अशा ठिकाणाहून कापड खरेदी करत होते. जे सावकार राज्याबाहेरून कापड खरेदी करीत त्यांना काही सवलती देण्यात येत होत्या. श्रीमंत माणसे मोठया प्रमाणावर कापडाचा व्यापार करीत होते. गरीब मात्र महाग कापड विकत देखील घेऊ शकत नव्हते. सरकारने कापड व्यापाऱ्यास उत्तेजन दिले होते. म्हणून या काळात कापडकरी सावकारांचा व्यवसाय उर्जित अवस्थेला पोहोचला होता.

पैठणी सारख्या मौल्यवान वस्त्रांचा व्यापारही सावकारांच्याच हाती होता. त्यामुळे विणकरांचा आर्थिक फायदा होत नव्हता.

बापूदेव पैठणकर यांजकडून कापड खरेदीचे पत्र असे—

श्री

हिशेब दरक समये कर्ज गु।। नारो निळकट मुजूमदार पाो सुपे सु।। खमत सबैन मया व अलफ जमा

रूपये

294।। छ 5 रायखर आखेरसाल बाा देणे खासगी नी।। सिवराम रघुनाथ राजवाडे जिनसाचे खरेदी बदल वगैरे बेगी बाा पाा रूबरू मारनिके याजकडे मजमूसमधे कर्जाचा अैवज रूपये 500 बायर केला त्यापैकी देविले रूपये

205। छ 29 रौवल बाा देणे ताा हरी बलाल यांजकउे लस्करात मशारनिके याणी बापूदेव पैठणकर याजपासून कापड खरेदी करून सावकार मशारनिके यास यैवज पुण्यास देविला त्यापैकी बाा पत्रे हरी बलाल पाा रूबरू मशारनिके याजकडून पाो मजकूर येथील मजमूचे दरक समधे यैवज करार केला त्यापैकी देविले रूपये [3]

***सरकारी पतपुरवठा :***

रास्ते, दीक्षित व पटवर्धन हरिभक्ती, परांजपे, वानोळे, अनागळे, भिडे, केंद्रे इत्यादी सावकार पेशव्यांना कर्जे देत होते. प्रत्येक वर्षे, प्रत्येक महिन्यात, प्रत्येक दिवशी हे सावकार सरकारला कर्जे देत होते. ही कर्जे रोख पैशांच्या, वस्तुंच्या किंवा मालाच्या स्वरूपात होती. जेंव्हा जेंव्हा गरज भासत असे तेंव्हा तेंव्हा पैशाच्या स्वरूपात कर्जे दिली जात होती. गोविंद नाईक पैठणकर आणि मन्साराम हरबाजी काळे या दोघांनी मिळून नाण्याचा पुरवठा केला होता.

***2) गुजारत सावकार :***

पेशवाईमध्ये जे विविध स्वरूपाचे सावकार होते त्यात गुजारत सावकाराचाही एक वर्ग होता. युद्धाच्या वेळी कर्जे देणाऱ्या सावकाराशिवाय प्रशासनासाठी मोठया प्रमाणात कर्जे देणाऱ्या सावकाराचा एक वर्ग 18 व्या शतकात महाराष्ट्रात होता. हा रोख स्वरूपात कर्जे देत होता. पुणे दफ्तरखान्यातील विविध घडणी रूमालात याची माहिती आढळते.

1।। हिसेब कर्ज गुजारत कृष्णाजी न।। व रामजी न।। भिडे सु।।
सब्त अर्बेन मया अलफ ।।1746।। जमा सन मस खत रू।।
10000 कार्तिक व. ।।1।।
10000 कार्तिक व. ।।1।।
5000 मार्ग शु .।।1।।
.........
25000
.........
पोता पैकी
फैलावण व।। वैशाख 10 सन खमसचे रू. 63000 ।।कार्तिक व।।1।। मु माहे
6/2 दरमाहे 10 ह प्रमाणे
59666 इ।। कार्तिक वद्य।।11 मु माहे 5829 दरमाहे 10 ह प्र।।
29000 इ मार्ग गु।।मु।। माहे 5/24 दरमाहे रू. 5 ह प्र।।
151666 व्याज सवोत्रा बिनसुट रू. 895।।

2।। हिसेब कर्ज गुजारत श्री परमहंस भार्गवराम बाब (ब्रम्हेंद्रस्वामी)
सीत अर्बेन मयन अलक 1740 जमा भाद्र व 3 सन खमस जमा
93000 मकोत्रा व्याजाचे
6000 सवोत्रा व्याजाचे

काही सावकार सरकारी ठेकेदार व दलाल असल्यासारखे वागत असत. 1794 मध्ये हरिभक्तीने लष्कराचा वेतन देण्याचा करार केला होता. पैसा हा विविध सावकाराकडून घेण्यात आला. 250000 रूपये भिडे यांच्याकडून 300000 रूपये व 225000 रूपये माधवरामचंद्र यांच्याकडून घेण्यात आले व बाकी देय रक्कम पुढे ओढण्यात आली होती.

***3)ब्राह्मण सावकार :***

पेशवे सरकार ब्राह्मणांना मोठया प्रमाणात चालना देत होते. लोक धार्मिक मनोवृत्तीचे होते. धार्मिक रितीरिवाजांचे ते पालन करीत होते. काही ब्राह्मण रणांगणांवर पराक्रम गाजवत होते. शत्रूंना कापून काढत होते. जे पाप होते म्हणून दैवीकृपा रहावी यासाठी धार्मिक कार्यक्रम

केले जात होते. हे कार्यक्रम करणारे पुरोहित असल्यामुळे पुरोहितांचे प्रचंड उत्पन्न होते. विद्वान ब्राह्मणांना पेशवे संरक्षण देत होते. त्यांना पैशाच्या स्वरूपात देणग्या किंवा दक्षिणा मिळत होत्या. जेव्हा पेशव्यांना आपल्या राजकीय कार्यक्रमासाठी राज्यविस्तारासाठी पैशाची गरज होती तेव्हा या ब्राह्मणांनी पेशव्यांना कर्ज देण्यास सुरूवात केली होती. पेशवे काळात पतपुरवठा करणारे सावकार हे ब्राह्मण होते. या ब्राह्मण सावकारावर तत्त्वनिष्ठ नैतिक चारित्र्यवान माणसे म्हणून पेशवे अंधश्रद्धेने विश्वास ठेवीत होते. खरे तर या सावकारांपैकी बरेच त्यांचे कौटुंबिक स्नेही होते. म्हणून सरकार त्यापैकी अनेकांना सवलती देत होते. त्यांच्या या धोरणाचा हे सावकार अधिक व्याजदर आकारण्यासाठी फायदा घेत होते. उदा. सदाशिव भट्ट यांनी पेशव्यांना दरमहा 2.5% दराने 25000 रूपयांचे कर्ज दिले होते. जेव्हा साधारण व्याजाचा दर 1% दरमहा होता.[4] अर्थातच पेशवे ब्राह्मणांच्या बाबतीत सहृदयी होते. त्यांना सनदा, देणग्या, दक्षिणा, प्रशासने देण्यात येत होत्या. सहाजिकच ब्राह्मणांची स्थिती सुधारली. त्याच्या बदल्यात या सावकारांनी सरकारला वेळोवेळी मदत केली. त्यातही सावकारांचा फायदा झाला. बहुतेक कोकणस्थ ब्राह्मण इतरांच्या तुलनेत बौद्धिक दृष्टिने प्रगत होते. त्यांनी सावकारी व्यवसायामध्ये पदार्पण करून हा व्यवसाय एक आव्हान म्हणून स्वीकारला. त्यापैकी अनेकजण लष्करी वृत्तीचे होते. पहिल्या बाजीरावास त्यांनी मदत केली. कारण सततच्या युद्धामुळे खजिन्यात पैसा राहत नव्हता व कर्जाची गरज भासत होती. अशावेळी सावकाराने स्वेच्छेने बाजीरावास कर्जे दिली. महाराष्ट्राबाहेरील सावकार त्रिकमशेठ यांनी पेशव्यास कर्ज देण्यास नाकारले होते. ज्यावेळी बाजीरावाच्या विस्तारवादी धोरणावर काही सावकारांचा विश्वास नव्हता म्हणून त्यास कर्जे देण्यास तयार नव्हते अशा वेळी बाबूजी नाईक जोशी जे पेशव्यांचे नातेवाईक होते व बाजीरावाचे गुरू ब्रम्हेंद्रस्वामी यांनी बाजीरावास हजारो रूपयांचे कर्जे दिली. पेशव्यांच्या भट घराण्याचे पुरोहित कर्वे यांनी देखील बाजीरावास मोठी कर्जे दिली होती. पेशवे देखील मोठया कर्जाऊ रकमासाठी जवळच्या नातेवाईकांवर अवलंबून राहत होते. याबाबतीत बाबूजी नाईक जोशी हे राजकीय सावकार आणि पेशव्यांचे नातेवाईक होते. सावकारी व्यवसाय हा त्यांचा वंशपरंपरागत व्यवसाय होता. कृष्णा आणि सदाशिव व बाबूजी नाईक जोशी बारामतीकर अशा तीन पिढया या व्यवसायात होत्या. 1720 ते 1740 या काळात त्यांना मानाच्या जागा देण्यात आल्या होत्या. पुढे पेशव्यांशी त्यांचे संबंध बिघडले. यानंतर पेशव्यांना छत्रपती शाहू व शिंदे होळकर या सरदारांना ब्रम्हेंद्रस्वामी कर्जे देत होते. या पैशांना ते श्री चा ऐवजी म्हणजे देवाची संपत्ती म्हणत पण त्यास व्याजाचा दर अधिक असे व त्याच्या मोबदल्यात अधिक सवलती मिळवत असत. जर स्वामींनी मागितल्याप्रमाणे त्यांची रक्कम परत दिली नाही तर ते शाप देत असत. अशा वेळेस पेशव्यांची अवस्था अत्यंत अवघड होत होती. शाहूच्या सर्व राण्या स्वामींचा आदर करीत. त्यांच्यावर स्वामींचा मोठा प्रभाव होता. सिध्दी आणि निजाम यांच्या राज घराण्यातील स्त्रियांवर देखील त्यांचा प्रभाव होता.

एका पत्रात ब्रम्हेंद्रस्वामींनी भाद्रपद तृतीया या दिवशी दरमहा 1 आणि 11/4% दराने कर्ज दिल्याचा उल्लेख आहे. 2 लाख रूप्ये आंग्रे यांना, 30 हजार रूपये पेशव्यांना 10 हजार शाहूची राणी सगुणाबाई यांना व 10 हजार रूपये पवार यांना दिल्यांच्या नोंदी आहेत.[5] ब्रम्हेंद्रस्वामींकडे शेकडो बैल होते. ज्यांचा वापर कोकणातून देशावर माल वाहतुकीसाठी केला जात होता. अशा स्वामीच्या सहाय्याने पेशव्याने आपला राज्यविस्तार केला. यात ब्राह्मण गुरू आणि सावकार यांनी पेशव्यांना मोठया प्रमाणात कर्जे दिली होते. तसेच काही लहान लहान रकमा दिल्या होत्या. यावरून असे सिध्द होते की, ब्राह्मण वर्गातील सामान्य माणसे देखील सावकारीच्या व्यवसायात आली होती. कर्वे, वासुदेव, भट्ट हे पेशव्याचे पुरोहित होते. त्यांनी सावकारी व्यवसायात पैसे गुंतविले होते. पुढे अनेक ब्राह्मणांनी हा व्यवसाय स्वीकारला.

हिशेब कर्ज गु।।वासुदेव भट कर्वे सु।। तीस सवैन मया व अलफ 46770।।छ.29 रो ।।व ल वि।। राजश्री नारोबा धुंडराज मुकाम सासवड जमा पोता गु।. मारनिले याजकडे कर्जाचा ऐवज करार केला असे त्याप्रमाणे जमा।।

50000 छ 5 रो वल नकत जमा
यादी करार वेदमूर्ती रघुनाथ भट पटवर्धन ।।9।।
275080 मिती कार्तिक शु. 9
24920 मिती फाल्गुन शु.।
300000

एकूण तीन लक्ष मात्र व्याजदर महाहे दरसाल अर्धा रू.।। तीत डुबला वर्तन सूट करार केला असे बारा महिने पावेतो रू.।। मागोनये बारा महिन्याअलीकडे सकारातून पुढे दुबलसचे दिल्या. उपरोक्त व्याजाचे रूपये जे होतील ते चहुमहिन्यांनी केल्याप्रमाणे करार तूर्त सध्या रूचे झाले.

21311 व्याजाचे + 34125 या खतामध्ये लिहून दिले.
24912 बाकी
200 दक्षिणेचे

वरील पत्रामधील नोंदी हया वासुदेव भट पटवर्धन यांच्या खात्याच्या आहेत. त्यांनी 3 लक्ष रूपये व्याजाने दिले. ज्यात अत्यंत कमी व्याज दर होता. जो 12 आणे होता.6 दक्षिणा आणि बक्षिस त्यास मिळाल्याची माहिती या नोंदीत आढळते.

महादेव भट शारंगपाणी या ब्राह्मणाने पेशव्याबरोबर जवळचे संबंध निर्माण केले होते. पुढे नाना फडणीसांशी ही जवळीक निर्माण केली होती. शारंगपाणी यांनी 75000 रूपये लष्करी खर्चासाठी दिल्याची नोंद देखील त्यात आहे. रघुनाथ नारायण यांच्या 20000 आणि 75000 अशा कर्जास तो जामीन होता. 102000 इतके कर्जे त्याने युध्द समयी दिली होती. रूपये 75000 छ 23 मोहरम बद्दल देणे.[7]

हरी बलाल फैजेचे खर्चाब।। महादेव भट यांजकडून कर्जाऊ ऐवज सडे स्वातीत घेतला तो रवानगी यात

राजमंडळ स्वामी राजश्री पंतप्रान कर्ज गु।। महादेव भट शारंगपाणी रद कर्ज रू. 102000 श्री 17 माहे जोवह ब।। देणे रद कर्ज मारनिल्हे याजपासून साल मजकुरी कर्जाउ घेता. तो मनोती सुध्दा रसानगी याद पहिल्या बाजीरावाच्या काळात बहुतेक सावकार ब्राह्मण जातीचे होते. सोबतच पेशव्यांना कर्ज देण्याचा सावकारी व्यवसाय करीत होते. कृष्णाजी भट कर्वे, कृष्णाजी जोशी, कर्वे पटवर्धन, परशुराम भट खरे गोखरे, कानडे, दातार, परांजपे, गजरे, अंगत, गोडसे, शारंगपाणी, हरिभक्ती साहुकार इ. पेशवे काळातील ब्राह्मण सावकारांचा उल्लेख करता येईल.
स्वारी राजश्री पंतप्रधान

कर्ज गु।। गणपतराव मोरेश्वर दिक्षीत

| रदकर्ज | रूपये |
|---|---|
| 12000 | छ 7 माहे रजब बदल देणे रदकर्ज गुजारत मशारनिके<br>याजपासून सन तीसेनात नासिकचे स्वारीत कर्जाचा अैवज<br>सरकारात घेतला त्या बाा रसानगी यादी आदा मानसिंगराव<br>गाईकवाडयाचे बंधू फत्तेसिंगराव गाईकवाड याजकडे सेना<br>खासखेल समसेर बाहादरीचे पद व सरजाम चालत होता<br>त्यास ते मृत्यू पावले खाा मारनिकेकडे पद व सरजाम करार |

करून देवून
नजरेचे चालसालाबदी फौजे सुधा अैवज
सरकारात घ्यावयाचा करार केला त्यापैकी तुर्तचे हफ्त्याचे
अैवजी देविले रूपये

महाराष्ट्राबाहेरून आलेल्या सावकारांचा वर्ग वरील ब्राह्मण सावकारांच्या शिवाय होता. ज्यांना अधिक सवलती उपभोगता येत होत्या. गुजराती आणि मारवाडी सावकार जागेतील विविध देशात होते; परंतु गुजराती महाराष्ट्रात आले नाही. डॉ. व्ही.डी. दिवेकर यांनी द इमर्जन्स इन इंजिनीअर्स बिझनेस क्लास इन महाराष्ट्रा इन 18 सेंच्युरी या निबंधात महाराष्ट्राबाहेरच्या व्यापारी सावकारांचे पुण्याच्या बाजार पेठेतील आगमन हा संशोधनाचा विषय होऊ शकतो असे म्हटले आहे. ते यथार्त आहे. पुणे दप्तरखाण्यातील अनेक घडणी दप्तर नोंदीवरून त्रिकमदास गुजर, जातेशेठ, बऱ्हाणपुरकर, जयकिसन प्राणनाथ, बालशेठ, गिरी आणि पुरी गोसावी पेशव्यांनी स्थानिक सावकारांना उत्तेजन दिले होते. त्रिकमदास या महाराष्ट्राबाहेरील सावकाराने पेशव्यांना 5 हजार रूपयांचे कर्ज नाकारले होते.

पुरवणी राजश्री रावू व राजश्री अपास्वामीचे सेवेशी विनंती उपरी स्वामीनी पत्र पाठविले. तेथे आज्ञा केली की, पुरवणी लिहून न पाठविली आहे तेच त्रिकन सेठीत पोहचल्याप्रमाणे त्यावरून त्यास स्वामीने पुरवणी वाचून दाखविली पाच हजार रूपये मागितले परंतु दिल्हे नाही.

मराठी सत्तेचा विस्तार होत गेला. इतर राज्यांच्या दरबारी मराठयांचे संबंध वाढत गेले व एक वरचढ व प्रबळ सत्ता झाली. त्यामुळे महाराष्ट्राबाहेरील सावकार महाराष्ट्रातील सावकारी व्यवसायात उतरू लागले. बाळाजी बाजीरावाच्या काळात त्यांची संख्या वाढली व सावकारी व्यवसायाचा विकास झाला. हजारो रूपये दुसऱ्या चलनात परिवर्तीत करून पाठविले जात होते. हुंडीचा व्यवसाय तेजीत होता. पेशवे व्यापाऱ्यांना पैसे देवून व्यवसाय करण्यासाठी चालना देत होते. 18 व्या शतकाच्या मध्यास महाराष्ट्रात महाराष्ट्राबाहेरील सावकारांमध्ये हरिभक्ती दुल्लभजी, सिदाप्पाशेठ, विरकर, मनोहरदास, दयाराम, अवतारसिंग, आहारवाले, भोकनजी, अवदूत, राठोड, हरिकिर्ण, वेणीराम, वाघोजी, बगाडिया इत्यादी प्रमुख होते. इ.स. 1773 मध्ये सवाई माधवरावांच्या काळात राज्य कारभाराचा प्रमुख नाना फडणवीस यांचे महाराष्ट्राबाहेरून आलेल्या सावकारांबरोबर घनिष्ट मैत्रीचे संबंध होते. जीवनशेठ बालाशेठ, भगवानदास, अजरामर, दयाराम, आत्माराम, पितांबरदास, भगवानदास, त्रिंबक, मोतीराम, पुरूषोत्तम शेठ, लक्ष्मीश्वर, हरिभक्ती, मनोहरदास, द्वारकादास, हिरणदास इत्यादींशी नाना फडणिसांचे चांगले संबंध होते. परंतु या मारवाडी, गुजराती, मुलतानी किंवा बोहरा सावकारांनी व्यवसायात मोठी गुंतवणूक केली नाही.

***4) गोसावी सावकार :***

सावकारी व्यवसायात मुख्यतः दोन प्रकारचे गोसावी होते. एक गिरी गोसावी आणि पुरी गोसावी. मुख्य व्यवसाय उंट, घोडे व विशेष प्रकारचे कापड पेशव्यांना विकणे हे होते. युध्द भूमीवर या प्राण्यांचा वापर वाहतुकीसाठी उपयुक्त ठरत होता. एका एका युध्दात शेकडो प्राणी पेशवे काळात मारले जात होते. म्हणून सतत नवीन प्राणी पेशव्यांना खरेदी करावी लागत असे. म्हणून या दोन्ही प्रकारच्या गोसाव्यांचा पेशव्यांशी संबंध येत असे. काहींना तर पेशव्यांकडून ठेकेही मिळत असत. अनुपमगीर गोसावी, बनारसी गीर गोसावी, इराकम गीर गोसावी, रघुनाथ गीर गोसावी, रूपपुरी, मनोहरपुरी, भवानीपुरी इत्यादी काही प्रसिध्द गोसावी होती. माधवजी शिंद्यांच्या नेतृत्वाखाली काही गोसावी लष्करी सेवा देखील करीत होते. काही सरकारी अधिकारी होते. अनुपम गीर गोसावी हा तर कटक आणि बंगाल मध्ये सरकारी येणी वसूल करीत होता. या काळात गोसावी पैशांचे व्यवहार चोख करून श्रीमंत झाले होते. त्यांनी आपली दोन ठिकाणे निर्माण केली होती. त्यास गोसावी पुरा म्हणत. त्यापैकी एक पुण्यात व एक साताऱ्यात होता. तरी पेशव्यांनी त्यांच्यापासून कर्जे घेतली होती पण मोठी गुंतवणूक त्यांना करता आली नाही.[9]

अधिक मासामुळे व्याजात कपात केली जात. त्यास बारोत्रा म्हणत. हप्त्या हप्त्याने कर्ज वसुली केली जात होती. इतर येणे असल्यास ती देखील एकूण रकमेतून वसूल केली जात होती. हिशोबाच्या दोन पध्दती होत्या. एक कच्ची रक्कम, दोन पक्की रक्कम. त्यानुसार व्याजदर आकारले जात. पक्क्या रकमेवरील व्याज आकारतांना मुदतीचा विचार केला जात होता. या प्रकारच्या कर्ज खात्यामुळे पेशवे कर्ज परत फेडीसाठी सतर्क होते. यात एवढा नफा होता की, साधारण परिस्थितीतील माणसाला देखील या धंद्याचा मोह आवरता आला नाही.[10]

अनेक पत्रातून पेशवे हे सावकारांना किती चांगली व सन्मानाची वागणूक देत होते. त्यांना खात्री देत होते हे कळवून देत होते. कपाविस ताराचे आणखी एक उदाहरण असे आहे की, नारोशंकर जाला झाशी व दतीया (ओरचा) च्या महसूल द्यावयाचा होता. म्हणून त्यांनी पाच ते सहा लाख रूपये कर्ज गोसाव्यापासून घेतले पण त्याची परतफेड न केल्याने त्यांना या उदाहरणावरून गोसावी सरकारी व्यवसायाचा विकास करावा कसा हातभार लावत होते ते दिसते. ते लोकरीच्या शौल रेशीमी व घोडे, उंट, हत्ती इत्यादींचा व्यापार करीत होते. या उलट असे काही गोसावी होते जे पैसे मागून पैसे मिळवित व सावकारी व्यवसायात गुंतवित. कर्ज वसुली अत्यंत कडक व जुलमी पध्दतीने करत असत. अनेकदा ते कर्जदार लोकांना ठार मारीत असत. पेशवे देखील त्यांच्या विरूद्ध कडक उपाययोजना करत असत.[11]

अनेक सावकारी पेढया अस्तित्वात होत्या. त्यांचे मुख्य कार्यालय राजधानी पुणे येथे असे कधी ते नाशिक, पैठण अशा ठिकाणीही असे. त्यांच्या शाखा बनारस, बऱ्हाणपूर आणि औरंगाबाद येथेही होत्या. जेथे त्यांच्या सावकारी व इतर व्यवसायांना अधिक वाव होता. तेथे ते शाखा काढीत. वानवळे सावकारांचे मुख्य ठिकाण पैठण हे होते. हरिभक्तीचा पुतण्या दुल्लभदास हा पुण्याच्या पेठीचा प्रमुख होता. या शाखा एकमेकांशी जोडलेल्या होत्या. याशिवाय काही फिरती पथके होती. हुमास्त्याचे काम त्याच्या शाखेचे खाते सांभाळून शिवाय वृद्धिंगत करण्याची त्याची जबाबदारी होती. त्याच्या मदतीस काही कारकून आणि इतर माणसे असत. पेढीचे मुख्य कार्यालय त्याच्या हिशोबाची तपासणी करीत असे. त्याच्यावर सही–शिक्का करून ते दुसऱ्या शाखांना पाठविले जात असे. गुढीपाडव्याचा दिवस म्हणजे चैत्र प्रतिपदेस त्यांच्या नव्या वर्षाची सुरूवात होत असे व फाल्गुन अमावस्येस वर्ष संपत असे. एक पेढी दुसऱ्या पेढीशी संबंधित असल्यास लेखा परीक्षणचा अहवाल दुसऱ्या पेढीला पाठविला जात असे.[12]

औरंगाबाद येथील भिडे सावकार आणि सदाशिव भट दीक्षित हे फाल्गुन महिन्यात आपले हिशोब एकमेकांना देत असत. त्यांच्या शेवटी चूकभूल द्यावी घ्यावी असे लिहिलेले असे. याचा अर्थ चूक असल्यास दुरूस्ती करून त्याप्रमाणे हिशोब केला जावा.[13]

पतपेढीच्या सावकारांना दिड ते 3% दलाली मिळत होती. ठेवीदार आपले पैसे सुरक्षित असल्याने व त्यावर व्याज मिळत असल्याने अत्यंत आनंदी असत. वर्षाच्या शेवटी अनेक खातेदारांना त्यांचे खाते दाखवून त्यावर त्यांची स्वाक्षरी घेतली जात असे. त्यांच्या खात्यावरील येणे आणि जमा याची खात्री करून दिली जात होती.[14]

***संदर्भ***


1)पेशवे दप्तर — खंड 23, पत्र क्र. 79
2)पुराभिलेख पुणे — घडणी, दप्तर क्र. 458
3)तत्रैव — घडणी, दप्तर क्र. 459
4)तत्रैव — घडणी, दप्तर क्र. 448

5)तत्रैव पत्र क्र. 448
6)तत्रैव पत्र क्र. 459
7)तत्रैव घडणी, दप्तर क्र. 459
8)तत्रैव घडणी, दप्तर क्र. 460
9)तत्रैव घडणी, दप्तर क्र. 376
10)पेशवे दप्तर खंड 17, पत्र क्र. 17
11)पुराभिलेख पुणे घडणी दप्तर, पृ. क्र. 376
12)तत्रैव पृ. क्र. 180
13)कुलकर्णी जी.एस. अर्थविजन अंक 15–3
14)तत्रैव पृ. क्र. 180

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database



Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org